## आजचे पंचांग

दिनांक : ११ जुलै २०२६वार : शनिवार
माह (अमावस्यांत) : ज्येष्ठ माह (पूर्णिमांत) :
आषाढ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन
पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : द्वादशी तिथी (१२ जुलै पहाटे ०२:०४ पर्यंत) त्यानंतर त्रयोदशी
तिथी नक्षत्र : कृत्तिका नक्षत्र (सकाळी ११:०३ पर्यंत) त्यानंतर रोहिणी नक्षत्र
योग : गण्ड योग (१२ जुलै रात्री १२:०४ पर्यंत) त्यानंतर वृद्धि योग

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

■ आरएनआय : MAHMAR/2021/85884 — शनिवार, दि. ११ जुलै २०२६ — ■ वर्ष - १ ■ अंक -२८४ ■ पाने - ४ — पुणे/पिंपरी-चिंचवड

## अ प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी अर्चना कराडे

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सर्व १० प्रभाग समितीच्या अध्यक्षपदी भाजपाच्या नगरसदस्यांची निवड झाली आहे. आता १३ जुलै रोजी या निवडणूक निकालाची औपचारिक घोषणा होईल, अशी माहिती महानगरपालिका सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी दिली.

## सारांश वृत्त

### केतन अगरवाल हत्या प्रकरणात मोठी घडामोड; थेट राष्ट्रपती मुर्मू यांच्याकडे धाव! वडिलांनी लिहिले पत्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई** केतन अगरवाल हत्याकांडातील मृत मुलाचे वडील विशाल अगरवाल यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना एक पत्र लिहून आपल्या मुलाला न्याय मिळावा अशी मागणी केली आहे. त्यांनी या प्रकरणाची सुनावणी जलदगती न्यायालयात व्हावी आणि गुन्हेगारांना कठोर शिक्षा दिली जावी, अशी मागणी केली आहे.

राष्ट्रपतींना लिहिलेल्या पत्रात विशाल अगरवाल यांनी म्हटले आहे की, ते एक उद्योगपती किंवा प्रभावशाली व्यक्ती म्हणून नव्हे, तर आपला मुलगा कायमचा गमावलेले एक वडील म्हणून न्याय मागत आहेत. मुलाच्या निर्घृण हत्येमुळे त्यांचे संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाले आहे आणि केतनला अखेर न्याय मिळेल या आशेवरच त्यांचा प्रत्येक दिवस जातो, असेही या पत्रात म्हटले आहे.

**मुलाला गमावल्यानंतर त्यांनी वडिलांनाही गमावले**

मुलाच्या मृत्यूनंतर अवघ्या २० दिवसांतच त्यांनी वडिलांना गमावले. त्यांच्या म्हणण्यानुसार, नातवाच्या मृत्यूचा धक्का सहन न झाल्याने आणि सततच्या तणावामुळे वडिलांचा मृत्यू झाला. अवघ्या २० दिवसांच्या कालावधीत त्यांनी मुलगा आणि वडील दोघांनाही गमावले, ज्यामुळे संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त झाले, असेही या पत्रात म्हटले आहे.

**जलदगती न्यायालयात खटल्याची सुनावणी करण्याची मागणी**

जलद न्याय मिळावा यासाठी या प्रकरणाची सुनावणी जलदगती न्यायालयात करावी, अशी मागणी त्यांनी केली.

# भ्रष्ट कर्मचाऱ्याला तांत्रिक त्रुटीचा आधार नाही; मुंबई उच्च न्यायालयाचा कठोर निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** भ्रष्टाचार आणि फसवणुकीसारख्या गंभीर गुन्ह्यांत दोषी ठरलेल्या कर्मचाऱ्यांना कायद्यातील तांत्रिक तरतुदींचा आधार घेऊन सेवेत पुनर्स्थापनेचा दावा करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. औद्योगिक विवाद कायद्याच्या **(Industrial D¦isputes Act)** कलम ३३(२)(बी) अंतर्गत मिळणारे संरक्षण हे प्रामाणिक कर्मचाऱ्यांच्या हितासाठी असून, भ्रष्टाचार किंवा बनावट कागदपत्रांच्या प्रकरणात दोषी ठरलेल्या व्यक्तीसाठी कायदेशीर ढाल ठरू शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती संदीप व्ही. मरणे यांच्या खंडपीठाने हा निर्णय देताना नमूद केले की, नियोक्त्याने कर्मचाऱ्याला सेवेतून कमी करताना दिलेल्या एका महिन्याच्या नोटीस वेतनामध्ये झालेली किरकोळ तांत्रिक तफावत ही बडतर्फी रद्द करण्यासाठी पुरेशी कारण ठरू शकत नाही.

न्यायालयाने स्पष्ट केले की, कायद्यातील या तरतुदींचा उद्देश कर्मचाऱ्याला अचानक सेवेतून काढून टाकल्यामुळे होणारा आर्थिक धक्का कमी करणे हा आहे. मात्र, गंभीर गैरव्यवहार, भ्रष्टाचार आणि फसवणुकीत दोषी आढळलेल्या कर्मचाऱ्याला केवळ प्रक्रियात्मक त्रुटीच्या आधारे पुन्हा सेवेत घेणे हा कायद्याच्या उद्देशाला हरताळ फासणारा प्रकार ठरेल.

**एका महिन्याच्या वेतनातील तफावत ठरली अपुरी**

या प्रकरणात बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या (MCGM²) जकात विभागातील एका लिपिकावर भ्रष्टाचार आणि बनावट दस्तऐवज तयार केल्याचे आरोप सिद्ध झाले होते. त्यानंतर महानगरपालिकेने संबंधित कर्मचाऱ्याची सेवा समाप्त केली होती.

मात्र, कर्मचाऱ्याने औद्योगिक न्यायालयात धाव घेतली. बडतर्फीच्या प्रक्रियेत औद्योगिक विवाद कायद्याच्या



कलम ३३(२)(बी) मधील एका महिन्याच्या वेतनाच्या अटीचे योग्य पालन झाले नसल्याचा दावा त्याने केला. औद्योगिक न्यायालयाने या तांत्रिक मुद्द्याच्या आधारे कर्मचाऱ्याच्या बाजूने निर्णय देत बडतर्फीला विरोध केला होता.

या निर्णयाला महानगरपालिकेने मुंबई उच्च न्यायालयात आव्हान दिले.

उच्च न्यायालयाने औद्योगिक न्यायालयाचा दृष्टिकोन अति-तांत्रिक असल्याचे सांगत तो फेटाळून लावला. केवळ वेतन गणनेतील किरकोळ त्रुटीमुळे भ्रष्टाचारासारख्या गंभीर गुन्ह्यात दोषी ठरलेल्या कर्मचाऱ्याला पुन्हा सेवेत घेणे योग्य ठरणार नाही, असे न्यायालयाने म्हटले.

**कायद्याचा गैरवापर रोखण्यावर भर**

न्यायालयाने आपल्या निर्णयातून स्पष्ट संदेश दिला आहे की, कामगार कायद्यांमधील संरक्षणात्मक तरतुदींचा उद्देश कर्मचाऱ्यांना अन्यायकारक कारवाईपासून संरक्षण देणे हा आहे; मात्र त्या तरतुदींचा वापर गंभीर गुन्ह्यात दोषी ठरलेल्या कर्मचाऱ्यांना फायदा मिळवून देण्यासाठी करता येणार नाही.

भ्रष्टाचारामुळे संस्थेवरील विश्वासाला धक्का बसतो आणि सार्वजनिक सेवेत कार्यरत कर्मचाऱ्यांकडून प्रामाणिकपणाची अपेक्षा अधिक असते. त्यामुळे अशा प्रकरणांत केवळ प्रक्रियात्मक त्रुटींवर भर देऊन दोषी कर्मचाऱ्याला दिलासा देणे योग्य नसल्याचे न्यायालयाने अधोरेखित केले.

मुंबई उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे भविष्यात भ्रष्टाचार, फसवणूक आणि गंभीर गैरवर्तनाच्या प्रकरणांमध्ये केवळ तांत्रिक कारणांचा आधार घेऊन बडतर्फीला आव्हान देण्याच्या प्रयत्नांना मर्यादा येण्याची शक्यता आहे.

# कोट्यवधींच्या योजनांना निधी, पण कर्मचाऱ्यांच्या पगाराला नाही? जल जीवन मिशनवर विधानसभेत सरकारला घेराव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** केंद्र आणि राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी जल जीवन मिशन व स्वच्छ भारत मिशनच्या यशाची जबाबदारी खांद्यावर घेणारे कंत्राटी कर्मचारी गेल्या आठ महिन्यांपासून मानधनाविना काम करत असल्याचा गंभीर मुद्दा गुरुवारी विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात ऐरणीवर आला. या प्रकरणावर काँग्रेसचे ज्येष्ठ आमदार विजय वडेट्टीवार यांनी सरकारला धारेवर धरत, कोट्यवधी रुपयांच्या योजना राबविणाऱ्या सरकारकडे कर्मचाऱ्यांच्या मानधनासाठी निधी नाही का? असा थेट सवाल उपस्थित केला.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत विधानसभा अध्यक्षांनी शासनाला आठ दिवसांच्या आत योग्य कार्यवाही करून सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले, त्यामुळे सरकारच्या भूमिकेकडे आता राज्यभरातील हजारो कंत्राटी कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

सभागृहात बोलताना विजय वडेट्टीवार यांनी सांगितले की, राज्यातील जिल्हा व तालुका स्तरावर कार्यरत असलेल्या जल जीवन मिशन आणि स्वच्छ भारत मिशनच्या कंत्राटी कर्मचाऱ्यांना गेल्या आठ महिन्यांपासून मानधन मिळालेले नाही. वारंवार शासनाकडे पाठपुरावा करूनही केवळ निधी उपलब्ध नाही हेच उत्तर दिले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

मानधन रखडल्यामुळे अनेक कर्मचाऱ्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट झाली असून, काहींवर आत्महत्येची वेळ आल्याचेही वडेट्टीवार यांनी




सभागृहात नमूद केले. काही कर्मचाऱ्यांनी शासनाला पत्र लिहून आपली व्यथा मांडली असून, कुटुंबाचा उदरनिर्वाह, मुलांच्या शिक्षणाचा खर्च, घरभाडे आणि बँक कर्जाचे हप्ते भरणे अशक्य झाल्याचे त्या पत्रांमध्ये नमूद असल्याचे त्यांनी सांगितले.

सरकारवर टीका करताना वडेट्टीवार म्हणाले, नियमित कर्मचाऱ्यांचा एक महिन्याचा पगार थांबला तरी आंदोलनाची भाषा होते. मग आठ-आठ महिने पगाराशिवाय काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांनी कसे जगायचे? असा सवाल उपस्थित करत त्यांनी सरकारच्या प्राधान्यक्रमावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

त्यांनी पुढे आरोप केला की, इतर विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध होत असताना राज्याच्या महत्त्वाच्या पाणीपुरवठा आणि स्वच्छता योजनांमध्ये प्रत्यक्ष काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या मानधनासाठी मात्र निधी नसल्याचे कारण दिले जात आहे. ही बाब केवळ प्रशासनिक अपयश नसून कर्मचाऱ्यांवरील अन्याय असल्याचे त्यांनी म्हटले.

चर्चेनंतर विधानसभा अध्यक्षांनी या विषयाची गंभीर दखल घेत शासनाला आठ दिवसांच्या आत प्रकरण निकाली काढण्यासाठी आवश्यक कार्यवाही करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. त्यामुळे अनेक महिन्यांपासून थकीत असलेल्या मानधनाचा प्रश्न मार्गी लागण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# राम मंदिराच्या दानपेटीतील पैशांचा शेअर बाजारात खेळ? आर्थिक गैरव्यवहाराच्या तपासात धक्कादायक दावे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अयोध्या :** अयोध्येतील राम मंदिरातील दानपेटीतील निधीच्या कथित अपहारप्रकरणात तपास पुढे सरकत असताना आर्थिक गैरव्यवहाराचे नवे पैलू समोर येत आहेत. तपासाशी संबंधित माहितीनुसार, दानपेटीतील कथित अपहारातून मिळालेली रक्कम केवळ लपवून ठेवण्यात आली नाही, तर तिची शेअर बाजार, व्याज व्यवहार आणि विविध आर्थिक साधनांमध्ये गुंतवणूक करण्यात आल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या पार्श्वभूमीवर पोलिसांनी आरोपी आणि त्यांच्या नातेवाईकांची ३० बँक खाती गोठवली असून, आर्थिक व्यवहारांचा सखोल तपास सुरू आहे.

तपासादरम्यान मुख्य आरोपींपैकी अनुकल्प मिश्रा याची त्याच्या निवासस्थानी नेऊन चौकशी करण्यात आली. तपासाशी संबंधित सूत्रांच्या माहितीनुसार, चौकशीत त्याने सहआरोपी अविनाश शुक्ला याच्यासोबत दानपेटीतील कथित अपहाराची रक्कम शेअर बाजारात गुंतवल्याचे सांगितल्याचा दावा करण्यात आला आहे. या दाव्याची अधिकृत पुष्टी तपास पूर्ण झाल्यानंतरच होऊ शकते.

तपासात असेही समोर आले आहे की, कथित अपहारातील काही रक्कम व्याजाने दिली गेली, तर काही पैसे नातेवाईक आणि जवळच्या व्यक्तींच्या खात्यांमध्ये जमा करून नंतर पुन्हा स्वतःच्या खात्यांमध्ये वळवण्यात आल्याचा संशय आहे. प्राथमिक तपासात गोठवण्यात आलेल्या खात्यांतील व्यवहार संबंधित व्यक्तींच्या अधिकृत उत्पन्नाशी विसंगत असल्याचे आढळल्याने आर्थिक तपास अधिक तीव्र करण्यात आला आहे.

याप्रकरणी पोलिसांनी आरोपींच्या घरांवर पुन्हा झडती घेतली. फॉरेन्सिक तज्ज्ञ आणि पंचांच्या उपस्थितीत मोबाईल फोन, संगणकीय उपकरणे, आर्थिक कागदपत्रे, गुंतवणुकीच्या नोंदी आणि इतर डिजिटल पुरावे जप्त करण्यात आले. याच कारवाईत दानाच्या कथित बनावट पावत्याही जप्त झाल्याची माहिती तपास यंत्रणांनी दिली आहे.

## आरएसएसची अनिवार्य नोंदणी आणि लेखापरीक्षणाची मागणी; कळबुर्गीत कोळी समाजाचे आंदोलन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कळबुर्गी :** कर्नाटकातील कळबुर्गी येथे कोळी समाजाच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस)ची अनिवार्य नोंदणी आणि नियमित आर्थिक लेखापरीक्षण करण्याची मागणी करत आंदोलन केले. समाजाचे नेते लच्छप्पा जामदार यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात संघटनेच्या आर्थिक व्यवहारांमध्ये अधिक पारदर्शकता आणण्याची मागणी करण्यात आली.

आंदोलकांनी राज्याचे गृहमंत्री प्रियांक खर्गे यांनी मांडलेल्या पारदर्शकतेच्या भूमिकेला पाठिंबा दर्शविला. देशात कार्यरत मोठ्या सामाजिक, धार्मिक आणि स्वयंसेवी संघटनांप्रमाणेच आरएसएससाठीही स्पष्ट नोंदणी प्रक्रिया, आर्थिक हिशेबांचे नियमित लेखापरीक्षण आणि सार्वजनिक उत्तरदायित्वाची व्यवस्था असावी, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

या आंदोलनामुळे स्वयंसेवी आणि वैचारिक संघटनांच्या नियमनाबाबत पुन्हा चर्चा सुरू झाली आहे. समर्थकांच्या मते, मोठ्या प्रमाणावर कार्य करणाऱ्या कोणत्याही संस्थेने पारदर्शक आर्थिक व्यवहार आणि उत्तरदायित्वाची तत्त्वे स्वीकारणे लोकशाही व्यवस्थेसाठी आवश्यक आहे. तर दुसरीकडे, अशा मागण्यांकडे काहीजण संघटनांच्या स्वायत्ततेच्या दृष्टीनेही पाहत आहेत.

# न्यायालाही जात असते का? विलास घुले हत्याप्रकरणी सरकारवर गंभीर आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**केज :** बीड जिल्ह्यातील टाकळी येथे झालेल्या विलास घुले हत्याप्रकरणाने आता केवळ कायदा-सुव्यवस्थेचा मुद्दा न राहता राज्यातील न्यायव्यवस्थेच्या निष्पक्षतेवरही प्रश्नचिन्ह निर्माण केले आहे. या प्रकरणात ओबीसी नेते नवनाथ वाघमारे यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्य सरकार आणि पोलिस प्रशासनावर गंभीर आरोप करत, सरकार जात पाहून कारवाई करत आहे, असा दावा केला. या आरोपांमुळे प्रकरणाला राजकीय आणि सामाजिक स्वरूप प्राप्त झाले असून, राज्यातील न्यायप्रक्रियेच्या विश्वासार्हतेवर चर्चा सुरू झाली आहे.

१० जुलै रोजी केज येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा मार्गे तहसील कार्यालयापर्यंत मोठा मोर्चा काढण्यात आला. या मोर्चामध्ये विलास घुले यांच्या कुटुंबीयांसह समाजबांधव आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संपूर्ण परिसरात कडक पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

टाकळी येथील रहिवासी विलास घुले यांचा काही दिवसांपूर्वी चाकू हल्ल्यात मृत्यू झाला होता. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, सुरू असलेले भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या घुले यांच्यावर प्राणघातक हल्ला करण्यात आला. या घटनेनंतर स्थानिक पातळीवर तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे की, हा केवळ खून नसून कायद्याच्या अंमलबजावणीतील दुहेरी निकषांचे उदाहरण आहे.

मोर्चादरम्यान बोलताना नवनाथ वाघमारे यांनी दावा केला की, या प्रकरणातील पुरवणी जबाबात खासदार बजरंग सोनवणे यांचे पुत्र गौरव सोनवणे यांचे नाव समोर आले असल्याचा आरोप आहे. तरीदेखील त्यांच्यावर अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही. सामान्य नागरिकाचे नाव आले असते तर आतापर्यंत अटक झाली असती. पण प्रभावशाली व्यक्तींशी संबंधित नाव असल्यामुळे कारवाई होत नाही, असा आरोप त्यांनी केला.

यापुढे जात वाघमारे यांनी अधिक गंभीर राजकीय आरोप करत म्हटले की, कदाचित खासदार बजरंग सोनवणे भविष्यात भाजपमध्ये प्रवेश करतील, या राजकीय शक्यतेमुळेच सरकार कारवाई करण्यास धजावत नाही. या विधानामुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना तोंड फुटले आहे. तथापि, या आरोपांबाबत सरकार किंवा संबंधित पक्षाकडून अधिकृत प्रतिक्रिया समोर आलेली नाही.

मोर्चेकऱ्यांनी या प्रकरणात अनेक मागण्या प्रशासनासमोर मांडल्या. मुख्य आरोपींवर महाराष्ट्र संघटित गुन्हे नियंत्रण कायदा (मकोका) अंतर्गत कारवाई करण्यात यावी, पुरवणी जबाबात नाव आल्याचा दावा करण्यात आलेल्या गौरव सोनवणे यांना तातडीने अटक करण्यात यावी, हा खटला फास्ट ट्रॅक न्यायालयात चालविण्यात यावा, मृत विलास घुले यांच्या पत्नीला शासकीय नोकरी देण्यात यावी तसेच फिर्यादी रमेश घुले यांना शस्त्रधारी पोलिस संरक्षण देण्यात यावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

या आंदोलनामुळे राज्यातील न्यायप्रक्रियेतील समानतेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. एखाद्या प्रकरणात राजकीय प्रभाव, सामाजिक ओळख किंवा जातीय समीकरणांचा परिणाम होत असल्याची भावना समाजात निर्माण होणे ही लोकशाहीसाठी धोकादायक बाब मानली जाते. आरोप कितीही गंभीर असले तरी त्यांची निष्पक्ष चौकशी होणे आणि दोषींवर कायद्यानुसार कारवाई होणे, हीच न्यायव्यवस्थेची अपेक्षा आहे.

दरम्यान, पोलिस तपास सुरू असून या प्रकरणातील सर्व बाबींची चौकशी सुरू असल्याचे पोलिस सूत्रांकडून सांगितले जात आहे. मात्र, आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे की, तपासाची गती आणि कारवाईतील विलंब यामुळेच संशय अधिक गडद होत आहे.

या प्रकरणात करण्यात आलेले सर्व राजकीय आरोप हे आंदोलनकर्त्यांनी केलेले आरोप असून त्यांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नाही. संबंधित व्यक्ती किंवा राज्य सरकारकडून अधिकृत भूमिका समोर आल्यानंतरच या आरोपांचे वस्तुनिष्ठ मूल्यांकन होऊ शकते. मात्र, एका तरुणाच्या हत्येनंतर न्याय मिळवण्यासाठी रस्त्यावर उतरावे लागते, ही वस्तुस्थिती स्वतःमध्येच राज्याच्या कायदा-सुव्यवस्था आणि न्यायप्रणालीसमोरील मोठे आव्हान अधोरेखित करते.

## संपादकीय

### लोकशाहीचा खरा कस ˙ व्यक्ती नव्हे, संस्थांची ताकद

लोकशाहीचा इतिहास सांगतो की कोणताही नेता कायमचा नसतो; पण संस्था टिकल्या तर राष्ट्र टिकते. निवडणूक जिंकणे म्हणजे लोकशाहीवर मालकी हक्क मिळणे नव्हे. तो केवळ पाच वर्षांसाठी मिळालेला घटनात्मक अधिकार असतो. त्या अधिकारावर नियंत्रण ठेवण्याचे काम संसद, न्यायपालिका, घटनात्मक संस्था, माध्यमे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे नागरिक करतात.

भारतात २०१४ पासून केंद्रात स्थिर बहुमताचे सरकार आहे. या काळात महामार्ग, डिजिटल इंडिया, जीएसटी, पायाभूत सुविधा, संरक्षण आणि परराष्ट्र धोरण अशा अनेक क्षेत्रांत महत्त्वाचे निर्णय झाले. त्याच काळात नागरिकत्व दुरुस्ती कायदा (उअअ) २०१९, कलम ३७० रद्द (५ ऑगस्ट २०१९), शेतकरी कायदे (२०२०) आणि त्यांची १९ नोव्हेंबर २०२१ रोजी झालेली माघार, तसेच २०२३ मध्ये संसदेत मंजूर झालेला महिला आरक्षण कायदा अशा अनेक निर्णयांवर देशभरात तीव्र सार्वजनिक चर्चा झाली. या सर्व घटनांनी एकच गोष्ट स्पष्ट केलीलोकशाहीत सरकारला निर्णय घेण्याचा अधिकार आहे; पण त्या निर्णयांवर प्रश्न विचारण्याचाही नागरिकांना तितकाच घटनात्मक अधिकार आहे.

अमेरिकेत ६ जानेवारी २०२१ रोजी कॅपिटॉलवर झालेल्या हल्ल्यानंतर न्यायालये, काँग्रेस आणि स्वतंत्र तपास यंत्रणांनी आपापल्या घटनात्मक अधिकारांचा वापर केला. त्यानंतर राष्ट्राध्यक्षांच्या निर्णयांवर न्यायालयीन आव्हाने, संसदीय चौकशी आणि सार्वजनिक चर्चा सुरूच राहिली. काही राजकीय गटांनी अमेरिकेच्या २५व्या घटनादुरुस्तीचाही उल्लेख केला; मात्र ती राजकीय चर्चेचा भाग राहिली, घटनात्मक प्रक्रियेत वापरली गेली नाही. या संपूर्ण प्रक्रियेत व्यक्तीपेक्षा संस्थांचे महत्त्व अधोरेखित झाले. (ऋथळझ्ञळशिवळर)

भारतातही न्यायपालिकेने वेळोवेळी सरकारच्या निर्णयांवर सुनावण्या घेतल्या आहेत. माहितीचा अधिकार कायदा (२००५), लोकपाल कायदा (२०१३), सर्वोच्च न्यायालयाचे विविध घटनात्मक निर्णय आणि संसदीय समित्यांचे अहवाल हे लोकशाहीतील नियंत्रण आणि संतुलनाचे आधारस्तंभ आहेत. सरकारच्या प्रत्येक निर्णयाला विरोध करणे जितके अयोग्य, तितकेच प्रत्येक निर्णयाला प्रश्न न विचारता स्वीकारणेही लोकशाहीच्या आत्म्याशी विसंगत आहे.


आज भारतीय लोकशाहीसमोर सर्वात मोठे आव्हान विरोधकांचे अस्तित्व नसून सार्वजनिक चर्चेची गुणवत्ता आहे. मतभेदांना देशभक्ती किंवा देशद्रोहाच्या चौकटीत बसविण्याची प्रवृत्ती वाढत आहे. सामाजिक माध्यमांनी संवादाचा वेग वाढवला; पण अनेकदा तथ्यांपेक्षा भावना प्रभावी ठरू लागल्या. लोकशाहीत असहमती ही दुर्बलता नसून सुधारण्याची संधी असते.

भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत लोकशाही गणराज्य ही संकल्पना केवळ मतदानापुरती मर्यादित नाही. ती अभिव्यक्ती स्वातंत्र्य, कायद्याचे राज्य, समानता आणि उत्तरदायित्व यांवर उभी आहे. सरकारला धोरणे ठरविण्याचे स्वातंत्र्य आहे; न्यायालयांना त्यांची घटनात्मक तपासणी करण्याचे स्वातंत्र्य आहे; संसदेला सरकारला उत्तरदायी धरण्याचा अधिकार आहे; आणि नागरिकांना शांततामय मार्गाने प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे.

लोकशाहीची गुणवत्ता नेत्यांच्या लोकप्रियतेने नव्हे, तर टीका सहन करण्याच्या क्षमतेने मोजली जाते. मजबूत सरकार देशाला दिशा देऊ शकते; पण मजबूत संस्था त्या दिशेला वैधानिक आधार देतात. म्हणूनच भारताची लोकशाही अधिक सक्षम करण्याचा मार्ग व्यक्तीपूजेत नाही, तर संविधान, संस्था आणि नागरिकांच्या स्वातंत्र्यावर दृढ विश्वास ठेवण्यात आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिकेत राडा : 'प्रोटोकॉल'च्या नावाखाली नगरसेविकेचा पत्रकारांशी वाद

## लिफ्टमनलाही सुनावले खडे बोल!




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड:पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत एका राष्ट्रवादीच्या नवनियुक्त नगरसेविकेने पत्रकारांशी आणि लिफ्टमनशी हुज्जत घातल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ''आता नगरसेविका शिकविणार पत्रकारांना प्रोटोकॉल? लिफ्टस मॅनवर ही आगपाखड'' अशा थेट शब्दांत 'पालिका संदेश' या साप्ताहिकाने या व्हीआयपी संस्कृतीवर कडाडून टीका केली आहे.नेमकी घटना काय?शिक्षण मंडळाच्या सभापतींच्या सन्मानानंतर लिफ्टने तळमजल्यावर जाणाऱ्या एका नवनियुक्त महिला नगरसेविकेने, त्याच लिफ्टमध्ये चढणाऱ्या पत्रकारांना मज्जाव करण्याचा प्रयत्न केला. शिक्षण समिती सभापती आणि त्यांच्या जोडीदाराला लिफ्टमध्ये प्रवेश दिल्यानंतर इतर कोणालाही येण्यास त्यांनी नकार दिला.यावेळी लिफ्टमध्ये असलेल्या एका महिला पत्रकाराने त्यांच्या या 'ॲटिट्यूड'बद्दल लिफ्टमनसमोर जाब विचारला असता,

नगरसेविकेने थेट 'प्रोटोकॉल' पाळण्याचे आदेश देत लिफ्टमनवरच आपली आगपाखड केली.''ही महापालिकेची लिफ्ट आहे, तुमची खाजगी मालमत्ता नाही!''''तुम्ही पत्रकारांचा अपमान करत आहात,'' असे एका महिला पत्रकाराने ठणकावून सांगताच नगरसेविका काही काळ शांत झाल्या. मात्र, लिफ्टमधून खाली उतरताच त्यांनी पुन्हा पत्रकारांना आणि लिफ्टमनला 'प्रोटोकॉल' शिकवण्याचा प्रयत्न केला.यावर पत्रकारांनी आणि लिफ्टमनने स्पष्ट केले की, लिफ्टचा वापर करण्याचा अधिकार सर्वांना आहे.

महापालिकेची लिफ्ट ही सर्वसामान्यांच्या करातून चालणारी सार्वजनिक मालमत्ता असून ती कोणाचीही वैयक्तिक मालमत्ता नाही.लिफ्टमनच्या स्वाभिमानाचा प्रश्न आणि लोकशाहीचा चौथा स्तंभया बातमीत नगरसेविकेच्या वर्तनाचा तीव्र निषेध करण्यात आला आहे.

लिफ्टमन हा देखील एक माणूस असून तो महापालिकेचा कर्मचारी आहे. वर्षानुवर्षे सेवा करणाऱ्या या कर्मचाऱ्यांवर डाफरण्याचा किंवा त्यांचा अपमान करण्याचा अधिकार कोणत्याही लोकप्रतिनिधीला नाही, असे यात म्हटले आहे. तसेच, पत्रकार हे लोकशाहीचा चौथा स्तंभ असून त्यांना त्यांच्या कामात अडथळा आणणे चुकीचे असल्याचे स्पष्ट केले आहे.अहंकार बाजूला ठेवून जनतेचे सेवक बना!नवनवीन निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना या बातमीच्या माध्यमातून मोलाचा सल्ला देण्यात आला आहे. लोकप्रतिनिधी हे जनतेचे प्रश्न (पाणी, रस्ते, ड्रेनेज, आरोग्य) सोडवण्यासाठी निवडून दिलेले 'सेवक' असतात. त्यामुळे निवडणुकीत मिळालेल्या यशामुळे हवेत न जाता, वैयक्तिक अहंकार बाजूला ठेवून पाय जमिनीवर ठेवावेत आणि जनतेप्रती असलेल्या आपल्या जबाबदाऱ्यांचे भान ठेवावे, असा टोला या लेखातून लगावण्यात आला आहे.

# महापालिकेच्या हलगर्जीपणामुळे गरीब रुग्णांच्या मोफत उपचारांवर गदा : आमदार शंकर जगताप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने शहरातील काही खाजगी रुग्णालयांना वाढीव एफएसआय (फ्लोअर स्पेस इंडेक्स) मंजूर करताना गरीब व गरजू रुग्णांसाठी मोफत खाटा राखीव ठेवण्याची अट घालण्यात कसूर केल्याची बाब विधानसभेत उघड झाली. चिंचवडचे आमदार शंकर जगताप यांनी उपस्थित केलेल्या तारांकित प्रश्नाला उत्तर देताना राज्य सरकारने ही बाब मान्य केली.

आमदार जगताप यांनी सांगितले की, महापालिकेच्या या निष्काळजीपणामुळे गरीब रुग्णांना हक्काच्या मोफत उपचारांपासून वंचित राहावे लागत आहे. त्यामुळे भविष्यात कोणत्याही खाजगी रुग्णालयाला जागा किंवा वाढीव एफएसआय देताना गरीब रुग्णांसाठी मोफत अथवा सवलतीच्या दरात उपचार आणि खाटा उपलब्ध करून देण्याची अट सक्तीची करण्यात यावी, अशी मागणी त्यांनी विधानसभेत केली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उत्तर देताना सांगितले की, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीनुसार थेरगाव येथील बिर्ला हॉस्पिटल आणि पिंपरी येथील डी. वाय. पाटील हॉस्पिटल यांना वाढीव एफएसआय मंजूर करण्यात आला. मात्र, संबंधित नियमावलीत गरीब रुग्णांसाठी मोफत खाटा राखीव ठेवण्याची अट समाविष्ट करण्यात आलेली नव्हती.

आमदार जगताप यांनी पुणे महापालिकेच्या धर्तीवर पिंपरी-चिंचवडमध्येही अशा अटी प्रभावीपणे लागू करण्याची मागणी केली. तसेच माहितीच्या अधिकारातून मिळालेल्या आकडेवारीचा हवाला देत त्यांनी पुण्यातील काही खाजगी रुग्णालयांमध्ये मोफत उपचारांच्या सुविधेचा अत्यल्प वापर होत असल्याकडे लक्ष वेधले. त्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रुबी हॉल क्लिनिकने गेल्या तीन वर्षांत केवळ ७२, सह्याद्री हॉस्पिटलने ७९ आणि के. के. आय. इन्स्टिट्यूटने ७५ गरीब रुग्णांवर मोफत उपचार केले आहेत. औंध येथील इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स आणि एम्स रुग्णालयातही या सुविधेचा लाभ अत्यल्प रुग्णांना मिळाल्याचे माहितीच्या अधिकारातून समोर आल्याचे त्यांनी सांगितले. गरीब रुग्णांना न्याय मिळावा आणि मोफत उपचारांची तरतूद प्रत्यक्षात प्रभावीपणे राबविली जावी, यासाठी सरकारने कठोर अंमलबजावणी करावी, अशी मागणी आमदार शंकर जगताप यांनी केली.

## पुण्यात एनडीए कॅडेटचा प्रशिक्षणादरम्यान मृत्यू; चौकशीचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुण्यातील राष्ट्रीय संरक्षण प्रबोधिनी (एनडीए) येथे प्रशिक्षण घेत असलेल्या १७ वर्षीय कॅडेटचा पहिल्याच शारीरिक प्रशिक्षण परेडनंतर मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी एनडीए प्रशासनाने 'कोर्ट ऑफ इन्क्वायरी'चे आदेश देत घटनेची चौकशी सुरू केली आहे.

मृत कॅडेटची ओळख अभिनव बाजपेयी अशी असून तो उत्तर प्रदेशातील रहिवासी होता. प्रशिक्षणादरम्यान त्याची प्रकृती अचानक बिघडल्याने त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. एनडीएच्या अधिकाऱ्यांनी घटनेची दखल घेत मृत्यूचे नेमके कारण शोधण्यासाठी अंतर्गत चौकशी सुरू केली आहे.

शवविच्छेदन अहवाल आणि चौकशीचा निष्कर्ष आल्यानंतरच मृत्यूचे अचूक कारण स्पष्ट होणार असल्याचे अधिकृत सूत्रांनी सांगितले. या घटनेमुळे एनडीए परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत असून कॅडेटच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# मोशी दुर्घटनेतील जखमींची महापौर रवि लांडगे यांनी घेतली रुग्णालयात भेट
## महापालिका सर्वतोपरी मदतीसाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मोशी येथील वेस्ट टू एनर्जी प्रकल्प परिसरात झालेल्या दुर्घटनेतील जखमी नागरिकांची महापौर रवि लांडगे यांनी गुरुवारी मेडिकव्हर हॉस्पिटल आणि साईनाथ हॉस्पिटल येथे भेट घेऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

यावेळी महापौरांनी जखमी नागरिक व त्यांच्या नातेवाईकांशी संवाद साधून त्यांना धीर दिला. या कठीण प्रसंगी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका बाधित कुटुंबांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असून आवश्यक ती सर्व मदत प्रशासनामार्फत उपलब्ध करून दिली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.

भेटीदरम्यान साईनाथ हॉस्पिटलचे प्रमुख तथा नगरसेवक डॉ. सुहास कांबळे, महापालिकेचे संबंधित अधिकारी आणि वैद्यकीय अधिकारी उपस्थित होते. महापौरांनी जखमींच्या प्रकृतीची सविस्तर माहिती घेत सर्वोत्तम वैद्यकीय उपचार मिळावेत, उपचारात कोणतीही त्रुटी राहू नये तसेच आवश्यक शासकीय समन्वय तातडीने साधावा, अशा सूचना अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी महापौर रवि लांडगे म्हणाले, मोशी येथील दुर्घटना अत्यंत वेदनादायी आहे. प्रत्येक बाधित कुटुंबाच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत. जखमींना सर्वोत्तम उपचार मिळावेत, त्यांच्या कुटुंबीयांना कोणतीही अडचण येऊ नये आणि आवश्यक त्या प्रत्येक स्तरावर महापालिका त्यांच्यासोबत राहील.



नागरिकांची सुरक्षितता हीच आमची सर्वोच्च जबाबदारी आहे. दुर्घटनेतील जखमी नागरिकांनी लवकर बरे व्हावे आणि त्यांच्या कुटुंबीयांना या संकटाचा सामना करण्याचे बळ मिळावे, अशी प्रार्थनाही महापौरांनी व्यक्त केली.

दरम्यान, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका प्रशासनाकडून बचावकार्य, वैद्यकीय उपचार, समन्वय आणि आवश्यक प्रशासकीय मदत युद्धपातळीवर सुरू असून बाधित नागरिकांना सर्वतोपरी सहकार्य करण्यासाठी संपूर्ण यंत्रणा कार्यरत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले.

# मटका जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा; तिघे ताब्यात!
## घटनास्थळः मोजे चाकण गावचे हद्दीत शनी मंदिराच्या मागे, चाकण

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** काय घडले? चाकण उत्तर पोलीस स्टेशनच्या पथकाने शनी मंदिराच्या पाठीमागे सुरू असलेल्या एका बेकायदेशीर मटका जुगार अड्ड्यावर अचानक छापा टाकला. तिथे आरोपी स्वतःच्या फायद्यासाठी लोकांकडून पैसे घेऊन 'कल्याण मटका' नावाचा जुगार खेळत आणि खेळवत असताना मिळून आले. पोलिसांनी घटनास्थळावरून रोख रक्कम आणि जुगाराचे साहित्य जप्त केले आहे. याप्रकरणी चंद्रकांत माणिकराव नायडे (वय ४५), नितीन लक्ष्मण आल्हाट (वय ४६) आणि अनिल ज्ञानेश्वर शेलार (वय ५७, सर्व रा. चाकण) यांच्यावर मुंबई जुगार कायदा कलमान्वये कारवाई करण्यात आली आहे.

प्रशासनाचा इशारा: वारीच्या काळात गर्दीच्या ठिकाणी पोलिसांनी गस्त वाढवली असून, संशयास्पद हालचाली करणाऱ्यांवर आणि गुन्हेगारांवर कडक नजर ठेवली जात आहे. नागरिकांनी आणि भाविकांनीही सतर्क राहावे.



**दिघीत पुन्हा वारीच्या गर्दीचा फायदा घेऊन सोन्याचे 'बदाम' चोरी!**

घटनास्थळ: दत्तनगर बस स्टॉप, दिघी, पुणे.

काय घडले? संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखी रथाचे दर्शन घेण्यासाठी मयुर श्रावण चिमटे हे आपल्या ३ वर्षांच्या मुलीसह गर्दीत उभे होते. यावेळी गर्दीचा फायदा उठवत आरोपी रघुनाथ बाबुराव दुकळे (वय ४२, रा. हडपसर) आणि रावसाहेब साहेबराव जाधव (वय ५५, रा. उस्मानाबाद) यांनी मयुर यांच्या मुलीच्या गळ्यातील १५,०००/- रुपये किमतीचे सोन्याचे ओम आकाराचे बदाम (१ ग्रॅम) झपटमारी करून तोडून नेले. दिघी पोलिसांनी दोन्ही आरोपींना बेड्या ठोकल्या आहेत.

**आळंदी: वारी बंदोबस्तात महिला कार चालकाचा थरार; पोलिसांचे बॅरिकेड्स उडवले!**

घटनास्थळ: धानोरे फाटा / पी.सी.एस. चौक, आळंदी.

काय घडले? आषाढी वारी बंदोबस्त २०२६ चे कर्तव्य बजावत असताना, वाहतूक नियंत्रण कक्षाच्या पोलीस निरीक्षक दिपाली दत्तात्रय धाडगे यांनी एका हुंडाई औरा गाड्याला रोकण्याचा प्रयत्न केला. मात्र, गाडीच्या महिला चालकाने (गाडी क्र. MH14/KW/8949) शासकीय आदेश झुगारून, अत्यंत हयगयीने आणि बेदरकारपणे कार चालवत थेट सरकारी बॅरिकेड्सला जोराची धडक दिली.

यात सरकारी मालमत्तेचे मोठे नुकसान झाले असून, महिला पोलीस अधिकाऱ्याच्या अंगावर गाडी घालून जीवितास धोका निर्माण केला. आळंदी पोलिसांनी या महिला चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# पालखी प्रस्थानानंतर आळंदीत युद्धपातळीवर स्वच्छता मोहीम; नगर परिषदेची तातडीची कारवाई

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी :** संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी प्रस्थान सोहळ्यानंतर आळंदी शहरात मोठ्या प्रमाणावर जमा झालेला कचरा, निर्माल्य आणि इतर अवशेष हटविण्यासाठी नगर परिषदेने युद्धपातळीवर विशेष स्वच्छता मोहीम राबवली. लाखो वारकऱ्यांच्या उपस्थितीनंतर शहर पूर्ववत स्वच्छ करण्यासाठी कर्मचारी, यंत्रसामग्री आणि विविध विभागांची पथके तातडीने कामाला लागली.



पालिका प्रशासनाने प्रमुख रस्ते, मंदिर परिसर, इंद्रायणी नदी घाट, पालखी मार्ग आणि सार्वजनिक ठिकाणांची विशेष स्वच्छता केली. कचरा संकलन, निर्माल्याची विल्हेवाट, रस्त्यांची धुलाई आणि निर्जंतुकीकरणाची कामे सलग सुरू ठेवण्यात आली.

धार्मिक सोहळ्यांनंतर स्वच्छता राखणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून नागरिक आणि भाविकांचीही सामूहिक जबाबदारी असल्याचे प्रशासनाने नमूद केले. मोठ्या धार्मिक कार्यक्रमांनंतर निर्माण होणारा कचरा कमी करण्यासाठी जनजागृती आणि कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याची गरजही यानिमित्ताने अधोरेखित झाली.

नगर परिषदेने शहरातील स्वच्छता लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी सर्व यंत्रणा कार्यरत केल्याचे सांगितले असून, भाविकांनाही स्वच्छता राखण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### कोंढव्यात वाढत्या सुरक्षेच्या प्रश्नावर सरकारची धावपळ; कॉम्बिंग ऑपरेशनपासून अतिरिक्त चौकीपर्यंत उपाययोजनांची घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : कोंढवा परिसरातील कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नावर सरकारने अखेर अधिक कठोर पावले उचलण्याचे संकेत दिले आहेत. सुरक्षा व्यवस्था मजबूत करण्यासाठी गरजेनुसार कॉम्बिंग ऑपरेशन राबविणे, पोलीस गस्त वाढविणे, सीसीटीव्ही यंत्रणा मजबूत करणे आणि अतिरिक्त पोलीस चौकी उभारण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, अशी माहिती राज्यमंत्री योगेश कदम यांनी विधान परिषदेत दिली.

कोंढवा परिसरातील परिस्थितीबाबत सदस्य योगेश टिळेकर यांनी नियम ९२ अन्वये अर्धा तास चर्चे दरम्यान मुद्दा उपस्थित केला होता. त्यावर उत्तर देताना राज्यमंत्र्यांनी सांगितले की, काही महिन्यांपूर्वी घडलेल्या एका गंभीर प्रकरणाच्या तपासात महत्त्वाच्या बाबी समोर आल्या असून हे प्रकरण राष्ट्रीय तपास संस्थेकडे (एनआयए) वर्ग करण्यात आले आहे.

मात्र, या घोषणांमुळे प्रशासनाच्या आधीच्या तयारीवरही प्रश्न उपस्थित होत आहेत. संवेदनशील भागांमध्ये नियमित देखरेख, पुरेसा पोलीस बंदोबस्त आणि प्रभावी गुप्तचर यंत्रणा असणे अपेक्षित असताना, घटना चर्चेत आल्यानंतरच उपाययोजनांना वेग का येतो, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

राज्यमंत्री कदम यांनी पोलीस आयुक्तांना आवश्यक सूचना देण्यात येणार असल्याचे सांगितले. तसेच अतिरिक्त पोलीस चौकी, वाढीव बंदोबस्त आणि एसआरपीएफची कायमस्वरूपी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत विचार केला जाईल, असे स्पष्ट केले. कोंढवा परिसरातील घडामोडींवर पोलीस आणि दहशतवादविरोधी पथक (एटीएस) लक्ष ठेवून असल्याचेही त्यांनी सांगितले. देशविरोधी घोषणाबाजी, घुसखोरी किंवा अन्य गंभीर प्रकार आढळल्यास कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही देण्यात आला. मात्र, केवळ कारवाईची भाषा न करता दीर्घकालीन सुरक्षा आराखडा तयार करणे, स्थानिक नागरिकांशी समन्वय वाढवणे आणि प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबवणे ही प्रशासनासमोरील खरी कसोटी ठरणार आहे.

# गावडेवाडी येथून अजामेळा दिंडीचे

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या अजामेळा दिंडी क्रमांक २६ चे आदर्श गाव गावडेवाडी (ता. आंबेगाव) येथून पंढरपूरकडे प्रस्थान झाले असल्याची माहिती दिंडीचे प्रमुख ह.भ.प. पत्रकार मधुकर महाराज गायकवाड आणि दिंडीचे चोपदार मधुकर महाराज साळवे यांनी दिली.

आळंदी प्रशासनाने यंदा दिंड्यांनी आळंदीत येऊ नये, असे आवाहन केल्यामुळे अजामेळा दिंडीने या सूचनेला प्रतिसाद देत गुरुवारी (दि. ९) गावडेवाडी येथील छत्रपती शिवाजी चौकातून वारकऱ्यांच्या उपस्थितीत पंढरपूरकडे प्रस्थान केले.



यावेळी दिंडीचे संस्थापक वैकुंठवासी निवृत्ती महाराज गायकवाड व सुभद्राबाई निवृत्ती महाराज गायकवाड यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. पांडुरंग महाराज गायकवाड, भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याचे संचालक मच्छिंद्र गावडे आणि कारखान्याचे माजी उपाध्यक्ष ज्ञानेश्वर गावडे यांच्या हस्ते करण्यात आले.

पुंडलिक वरदे हरी विठ्ठलच्या जयघोषात दिंडीने पंढरपूरकडे प्रस्थान केले. यावेळी मच्छिंद्र गावडे, ऋषिकेश गावडे, संतोष गावडे, ह.भ.प. सुरेश महाराज गावडे, ह.भ.प. बाळू बुवा शेळके, ह.भ.प. ज्ञानेश्वर गावडे, ह.भ.प. लहू महाराज गावडे, मंदाताई गावडे, सविता मधुकर महाराज गायकवाड तसेच कमलादेवी मळ्यातील बहुसंख्य युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याशिवाय डॉ. प्रतिक गायकवाड, प्रा. शीलाताई पांडुरंग गायकवाड, चांगुणाबाई शेळके, कौसाबाई टाव्हरे, हरणाबाई टाव्हरे, सुनील महाराज राजगुरू, बाळू राजगुरू, वाहनचालक कैलास पडवळ, पिकअप चालक बाबाजी गव्हाणे आदींनी दिंडीला विविध प्रकारचे सहकार्य केले.

दिंडीच्या प्रस्थानप्रसंगी गावडेवाडी ग्रामस्थांनी वारकऱ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी भिवाजीनाना गावडे, अनाजी गावडे, नरेंद्र गावडे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष रवींद्र गावडे, माजी सरपंच देवराम तात्या गावडे, माजी सरपंच संतोष गावडे आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

फोटो ओळ : आदर्श गाव गावडेवाडी (ता. आंबेगाव) येथून संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होण्यासाठी अजामेळा दिंडी क्रमांक २६ चे पंढरपूरकडे उत्साहात प्रस्थान झाले.

# ‘लोफर्स ॲट हार्ट’ : पुण्यातील ब्रेड-केंद्रित कॅफेची वेगळी ओळख

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : पुण्यातील खाद्यसंस्कृतीत नवे प्रयोग सातत्याने पाहायला मिळत असून, त्यात ‘डेरषशऑ रीं क्शरऑ’ या ब्रेड-केंद्रित कॅफेने वेगळी ओळख निर्माण केली आहे. ताज्या, हस्तनिर्मित ब्रेडवर आधारित विविध पदार्थ आणि साधेपणाला प्राधान्य देणाऱ्या संकल्पनेमुळे या कॅफेची खाद्यप्रेमींमध्ये चर्चा आहे.



या कॅफेची स्थापना बाई मु डॅन या संस्थापकांनी केली असून, पारंपरिक बेकरी उत्पादनांना आधुनिक स्वरूप देण्याचा प्रयत्न येथे करण्यात आला आहे. विविध प्रकारचे सॉरडो ब्रेड, सँडविच, पेस्ट्री आणि हंगामी पदार्थ ग्राहकांसाठी उपलब्ध आहेत.

ब्रेड हा केवळ पूरक पदार्थ नसून जेवणाचा मुख्य घटक असू शकतो, ही संकल्पना या कॅफेच्या माध्यमातून मांडण्यात आली आहे. गुणवत्तापूर्ण साहित्य, स्थानिक घटकांचा वापर आणि हस्तकौशल्यावर भर देत ग्राहकांना वेगळा खाद्यअनुभव देण्याचा प्रयत्न केला जात आहे.

पुण्यातील वाढत्या कॅफे संस्कृतीमध्ये "Loafers at Heart' हे ब्रेडप्रेमींसाठी एक वेगळे आकर्षण ठरत असून, खाद्यप्रेमींकडून त्याला सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे.

# नरसिंह विद्यालयाचे शिष्यवृत्ती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव** : रांजणी (ता. आंबेगाव) येथील रयत शिक्षण संस्थेच्या नरसिंह विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेज ऑफ कॉमर्स, भागशाळा वळती मांजरवाडीच्या विद्यार्थ्यांनी इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विद्यालयातील चार विद्यार्थ्यांनी जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळवत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला असल्याची माहिती प्राचार्य निलेश बाणखेले यांनी दिली.



यशस्वी विद्यार्थ्यांना विकास गोसावी, भरत थोरात, अस्मिता गोडे, पवन काळे, एकनाथ कुमकर, वृषाली वाढे, भारती जाधव आणि भारत मोरे यांचे मार्गदर्शन लाभले.

जिल्हा गुणवत्ता यादीत स्थान मिळविणारे विद्यार्थी पुढीलप्रमाणे आहेत :

✻ पार्थ भोर – २५० गुण ✻ श्रेया मुळे – २३२ गुण ✻ साई भोर – २१८ गुण ✻ सोहम वाघ – २१६ गुण

या गुणवंत विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे प्राचार्य निलेश बाणखेले, स्कूल कमिटी सदस्य मधुकर हांडे, एकनाथ भोर, बंडेश वाघ तसेच शिक्षक व पालकांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या..

# अखिल भारत हिंदू महासभेच्या पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी अर्जुन मेदनकर

## सामाजिक कार्याची दखल; विविध स्तरांतून अभिनंदन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी** : अखिल भारत हिंदू महासभेच्या पुणे जिल्हा उपाध्यक्षपदी अर्जुन मेदनकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ही नियुक्ती करण्यात आल्याची माहिती अखिल भारत हिंदू महासभेचे वरिष्ठ राष्ट्रीय उपाध्यक्ष वैभवराज शिवाजी रौंधळ यांनी दिली.

नियुक्तीप्रसंगी आंतरराष्ट्रीय संरक्षक श्री श्री १००८ जगद्गुरू स्वामी माधवानंद सरस्वतीजी महाराज, कार्यकारी अध्यक्ष योगेंद्र वर्मा, वरिष्ठ राष्ट्रीय उपाध्यक्ष वैभवराज शिवाजी रौंधळ, राष्ट्रीय महामंत्री डॉ. सिद्धार्थ भट्टाचार्य, राष्ट्रीय कोषाध्यक्ष साक्षी वर्मा, महामंत्री आचार्य अजय कृष्ण शास्त्री, राष्ट्रीय धर्मप्रचारक योगी दादानाथजी गुरु सुखनाथजी, योगी महंत शिवनाथजी महाराज, बालयोगी ऋषिकेशनाथजी महाराज, प्रकाशनाथजी महाराज, योगी शीतलनाथजी, योगी सुंदरनाथजी, महंत सचिदानंद सरस्वतीजी महाराज, महंत योगानंद सरस्वतीजी, महंत किशोरानंद सरस्वतीजी महाराज, राष्ट्रीय उपाध्यक्ष डॉ. त्यागी, महाराष्ट्र राज्य प्रभारी राणीताई पवार, महाराष्ट्र राज्य अध्यक्ष भावेश पाटील, महाराष्ट्र राज्य महिला अध्यक्षा आरती राजपूत, कर्नाटक प्रदेश प्रभारी अशोककुमार नानू राठोड, महाराष्ट्र राज्य सरचिटणीस प्रकाश तांबट, महाराष्ट्र राज्य मीडिया विभाग उपाध्यक्ष विष्णूभाऊ बिचकुले, लक्ष्मीकांतभाऊ शिंदे, पालघर जिल्हाध्यक्ष प्रिया शंकरराव, पुणे जिल्हाध्यक्ष सागर निंबाळकर, महाराष्ट्र राज्य सदस्य दिनेश माळी, शहराध्यक्ष अंकित वाघ, नाशिक जिल्हा उपाध्यक्षा पूनम गांगुर्डे, उपाध्यक्ष पुनीत गोयल तसेच उत्तर प्रदेश विधी विभागाचे अध्यक्ष रवी ब्रिजभूषण यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी झालेल्या बैठकीत अर्जुन मेदनकर यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. उपस्थित पदाधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

या नियुक्तीचे पुणे जिल्ह्यात स्वागत करण्यात आले असून आळंदी जनहित फाउंडेशनचे अध्यक्ष राजेंद्र घुंडरे पाटील, तुकाराम महाराज ताजने, विश्वकर्मा महाराज पांचाळ तसेच विविध सामाजिक व सेवाभावी संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी अर्जुन मेदनकर यांचे अभिनंदन करून शुभेच्छा व्यक्त केल्या.

# देवगाव–पिंपरखेड जोडणाऱ्या बंधाऱ्याचे संरक्षण कठडे तुटल्याने

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्यातील देवगाव आणि शिरूर तालुक्यातील पिंपरखेड या गावांना जोडणाऱ्या कोल्हापुरी बंधाऱ्यावरील संरक्षण कठडे तुटल्याने नागरिकांसह विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे.




या बंधाऱ्यावरून दररोज मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. तसेच देवगाव येथील अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी पिंपरखेड येथील श्री दत्त माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात ये-जा करतात. दोन दिवसांपूर्वी झालेल्या मुसळधार पावसानंतर घोड नदीत सोडण्यात आलेले पाणी तसेच मिना नदीला आलेल्या पुरामुळे बंधाऱ्यावरील सुमारे दोन वर्षांपूर्वी बसविण्यात आलेले संरक्षण कठडे तुटून गेले आहेत. त्यामुळे नागरिक व विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

दरम्यान, गावातील युवकांनी पुढाकार घेत पुलावरील कचरा व लोखंडी जाळी बाजूला करून तात्पुरत्या स्वरूपात वाहतूक सुरू केली आहे. मात्र, ही व्यवस्था अपुरी असून प्रशासनाने तातडीने दखल घेऊन बंधाऱ्यावर नवीन सुरक्षा कठडे (साईड गार्ड) बसवावेत, अशी मागणी ग्रामस्थांकडून करण्यात आली आहे.

ही मागणी माजी सरपंच दिपाली खांडगे, उपसरपंच दिलीप दाभाडे, ग्रामपंचायत सदस्य माऊली दाभाडे, मोहन पोखरकर, माजी सरपंच जयेश पोखरकर, माजी सरपंच निलेश खांडगे, अशोक खांडगे, प्रकाश दंडवते, विशाल खांडगे, सुभाष खांडगे आदी ग्रामस्थांनी केली आहे.

# पुण्यात कचऱ्याचा डोंगर कोसळला; ४८ तासांनंतरही सात जण बेपत्ता, बचाव पथकांची काळाशी शर्यत

■ पुणे : प्रतिनिधी

**पुणे** : पिंपरी-चिंचवड परिसरातील मोशी येथे कचऱ्याचा मोठा ढिगारा कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर ४८ तास उलटूनही सात जण बेपत्ता आहेत. बचाव पथके ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांचा शोध घेत असून, प्रत्येक क्षण महत्त्वाचा ठरत आहे. मात्र, या दुर्घटनेने शहरातील कचरा व्यवस्थापन, प्रशासनाची तयारी आणि वाढत्या कचऱ्याच्या डोंगरांचा गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणला आहे.

मोशी परिसरातील कचरा डेपोमध्ये साचलेल्या प्रचंड कचऱ्याचा भाग अचानक कोसळल्याने अनेक नागरिक ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती व्यक्त करण्यात आली. घटनेनंतर अग्निशमन दल, राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल (एनडीआरएफ) आणि स्थानिक प्रशासनाच्या पथकांनी तातडीने बचावकार्य सुरू केले. यंत्रसामग्रीच्या मदतीने कचरा हटवण्याचे काम सुरू असले तरी ढिगाऱ्याची अस्थिरता आणि मोठ्या प्रमाणातील कचऱ्यामुळे बचाव मोहिमेला अडथळे येत आहेत.

सात जणांचा अद्याप शोध लागलेला नसल्याने त्यांच्या कुटुंबीयांची चिंता वाढली आहे.



घटनास्थळी नातेवाईकांकडून आपल्या प्रियजनांच्या सुरक्षिततेसाठी प्रतीक्षा केली जात आहे. बचाव पथकांसाठीही ही मोहीम आव्हानात्मक ठरत असून, ढिगाऱ्याखाली कोणी जिवंत असल्याची शक्यता लक्षात घेऊन अत्यंत सावधगिरीने काम केले जात आहे.

या दुर्घटनेनंतर शहरातील कचरा व्यवस्थापनाच्या पद्धतींवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. वर्षानुवर्षे कचरा एका ठिकाणी साठवला जात असताना त्यावर योग्य प्रक्रिया, विलगीकरण आणि वैज्ञानिक व्यवस्थापन कितपत झाले, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे. कचऱ्याचे डोंगर तयार होणे ही केवळ स्थानिक समस्या नसून शहरी नियोजनातील मोठी त्रुटी असल्याचे पर्यावरण तज्ज्ञांचे मत आहे.

महानगरपालिका आणि प्रशासनाकडून कचरा व्यवस्थापनासाठी विविध उपाययोजना केल्या जात असल्याचे सांगितले जाते; मात्र प्रत्यक्ष परिस्थिती अनेकदा वेगळे चित्र दाखवते. कचरा डेपो सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक तांत्रिक उपाय, नियमित तपासणी आणि दीर्घकालीन नियोजनाचा अभाव अशा दुर्घटनांना कारणीभूत ठरू शकतो, अशी टीका केली जात आहे.

या घटनेने केवळ बचावकार्याचा प्रश्न निर्माण केला नाही, तर शहरांच्या वाढत्या कचऱ्याच्या संकटाकडेही लक्ष वेधले आहे. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने कचरा डेपोंचे व्यवस्थापन अधिक काटेकोर करण्याची गरज आहे. दुर्घटना घडल्यानंतर मदतकार्य करण्यापेक्षा अशा घटना घडू नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे अधिक महत्त्वाचे ठरते.

सध्या बचाव पथकांची मोहीम सुरू असून, बेपत्ता नागरिकांचा शोध घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

मात्र, या दुर्घटनेने प्रशासनासमोर एक मूलभूत प्रश्न उभा केला आहेशहरांचा वाढता कचरा सुरक्षितपणे हाताळण्यासाठी यंत्रणा कितपत सक्षम आहे?

## सारांश वृत्त

### पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात ५० 'हिरकणी कक्ष'; महिला व बालकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** संत ज्ञानेश्वर आणि संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने महिला, लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी जिल्हाभरात ५० 'हिरकणी कक्ष' सुरू केले आहेत. वारकऱ्यांच्या मोठ्या गर्दीत महिलांना तातडीची मदत, विश्रांती आणि आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने ही व्यवस्था करण्यात आली आहे.

या हिरकणी कक्षांमध्ये हरवलेल्या बालकांना सुरक्षित ठेवणे, महिलांना आवश्यक वैद्यकीय व समुपदेशनाची मदत, पिण्याचे पाणी, प्राथमिक उपचार तसेच पोलीस आणि प्रशासनाशी त्वरित संपर्काची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रशिक्षित कर्मचारी आणि संबंधित विभागांच्या समन्वयातून हे कक्ष कार्यरत आहेत.

दरवर्षी लाखो वारकरी पालखी सोहळ्यात सहभागी होत असल्याने गर्दीच्या ठिकाणी महिला आणि बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. ही बाब लक्षात घेऊन प्रशासनाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून हिरकणी कक्षांची उभारणी केली आहे.

प्रशासनाने वारकरी आणि नागरिकांना गरज भासल्यास जवळच्या हिरकणी कक्षाशी संपर्क साधण्याचे आवाहन केले असून, पालखी मार्गावरील सर्व विभागांमध्ये समन्वयातून ही सेवा सुरू ठेवण्यात येणार असल्याचे सांगितले आहे.

# 'हरवलेला आमचा विठ्ठल पुन्हा आम्हाला दे', वारीत अजितदादांचे अनोखे स्मरण; विद्यार्थ्यांकडून वारकऱ्यांना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** आषाढी वारी म्हणजे भक्ती, सेवा आणि माणुसकीचा संगम असते. यंदाच्या वारीत या परंपरेला भावनिक स्पर्श देणारे एक वेगळे दृश्य पुणे शहरात पाहायला मिळाले. फर्ग्युसन महाविद्यालय रस्त्यावरील एका इमारतीवर मोठी एलईडी स्क्रीन लावून दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा फोटो आणि 'आमचा विठ्ठल कायम स्मरणात' असा संदेश झळकविण्यात आला. त्याचबरोबर 'हरवलेला आमचा विठ्ठल पुन्हा आम्हाला दे' असा भावनिक संदेशही स्क्रीनच्या माध्यमातून देण्यात आला.

या उपक्रमातून अजित पवार यांच्याविषयी असलेले प्रेम आणि त्यांच्या लवकर पुनरागमनासाठी भावनिक साद घालण्यात आली. राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवारांचे अपघाती निधन हे सर्वांना चटका लावून गेले. त्यांच्या निधनाला सहा महिने उलटले तरी त्यांच्या वारीतील हसमुख चेहरा अजूनही पुणेकर विसरले नाहीत. त्यामुळे यंदाच्या वारीत पुणेकरांनी लाडक्या अजितदादांच्या स्मृतींना




उजाळा दिला.

याशिवाय बारामती हॉस्टेलमधील विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांसाठी मोफत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली होती. दिवसभर पायी चालणाऱ्या हजारो वारकऱ्यांना थंड पाणी देत विद्यार्थ्यांनी सेवाभाव जपला. पाण्याचा प्रत्येक ग्लास देताना त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होते. वारकरीही विद्यार्थ्यांच्या या सेवाभावाचे कौतुक करत त्यांना आशीर्वाद देत पुढे जात होते.

जलसेवा केंद्रात उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा फोटो ठेवून त्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला होता. सेवा आणि स्मरण यांचा संगम या उपक्रमातून अनुभवायला मिळाला. वारकरी संप्रदायात सेवा हीच खरी पूजा मानली जाते. कोणताही गाजावाजा न करता वारकऱ्यांची तहान भागविण्याचे काम विद्यार्थ्यांनी केले, तर दुसरीकडे भावनिक संदेशातून आपल्या नेत्याविषयीची आत्मीयता व्यक्त करण्यात आली. त्यामुळे भक्ती, सेवा आणि भावना यांचे सुंदर चित्र या उपक्रमातून उभे राहिले.

## '३ इडियट्स'च्या तमिळ रिमेकला माधवनचा नकार; विजयच्या चित्रपटाबाबत चर्चांना वेग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई/ठाणे :** अभिनेता आर. माधवनने '३ इडियट्स'च्या तमिळ रिमेकमध्ये काम करण्यास नकार दिल्याचा खुलासा केला आहे. प्रसिद्ध दिग्दर्शक शंकर यांनी या चित्रपटासाठी संपर्क साधला होता, मात्र काही कारणांमुळे माधवनने ही भूमिका स्वीकारली नाही. या खुलाशामुळे पुन्हा एकदा या बहुचर्चित रिमेकची चर्चा सुरू झाली आहे.

हिंदीतील '३ इडियट्स'मध्ये माधवनने साकारलेली फरहान ही भूमिका विशेष लोकप्रिय ठरली होती. या चित्रपटाचा तमिळ रिमेक करण्याची योजना होती आणि त्यासाठी अभिनेता विजयचा विचार करण्यात आला होता. मात्र, माधवनच्या मते, निर्मिती प्रक्रियेतील काही बाबींमुळे त्याला हा प्रकल्प योग्य वाटला नाही.

माधवनने सांगितले की, शंकर यांनी हा चित्रपट तुलनेने जलदगतीने पूर्ण करण्याचा उल्लेख केला होता. या दृष्टिकोनामुळे त्याच्या मनात काही शंका निर्माण झाल्या आणि त्याने या प्रकल्पापासून दूर राहण्याचा निर्णय घेतला. '३ इडियट्स' हा शिक्षण व्यवस्था, मैत्री आणि विद्यार्थ्यांवरील दबाव यांसारख्या विषयांवर भाष्य करणारा चित्रपट होता. त्यामुळे त्याच्या रिमेककडूनही प्रेक्षकांच्या मोठ्या अपेक्षा होत्या. मात्र, कलाकारांच्या निर्णयांमुळे आणि निर्मितीविषयक बदलांमुळे हा प्रकल्प चर्चेचा विषय ठरला.

## जामा मशिदीत हनुमान चालिसा वाचू देतील का?'; योगी आदित्यनाथ यांचा काँग्रेस-सपावर हल्लाबोल

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**अयोध्या :** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी अयोध्येत बोलताना विरोधी पक्षांवर तीव्र राजकीय निशाणा साधला आहे. ''पूर्वीच्या विरोधी सरकारच्या काळात अयोध्येतील पवित्र हनुमानगढी मंदिराच्या पायऱ्यांवर नमाज पठण करण्याचा प्रयत्न करण्यात आला होता,'' असा खळबळजनक आरोप त्यांनी केला.मुख्यमंत्र्यांचे विरोधकांना थेट सवालतुष्टीकरणाचे राजकारण: काँग्रेस आणि समाजवादी पक्षाने (SP) नेहमीच हिंदू आस्थेचा अपमान करून तुष्टीकरणाचे राजकारण केल्याचा आरोप मुख्यमंत्र्यांनी केला.नमाज पठणाचा वाद: २००३ मधील मुलायमसिंह यादव यांच्या नेतृत्वाखालील सरकारचा अप्रत्यक्ष संदर्भ देत, हनुमानगढी मंदिर परिसरात नमाज पठणाची मुभा देणे हे एक मोठे 'पाप' होते, असे योगी आदित्यनाथ म्हणाले.मशिदीचे आव्हान: ''कोणताही विरोधी पक्ष किंवा त्यांचे सरकार जामा मशिदीच्या आत 'हनुमान चालिसा' पठण करण्याचे धाडस करू शकते का?'' असा थेट सवाल त्यांनी विरोधकांना विचारला.माफीची मागणी: या ऐतिहासिक चुकीबद्दल समाजवादी पक्ष आणि काँग्रेसने देशातील जनतेची आणि हिंदू समाजाची जाहीर माफी मागितली पाहिजे, अशी मागणी त्यांनी बिकापूर येथील सभेत केली.अयोध्या दौऱ्याची पार्श्वभूमीङ्खढ तपासानंतर पहिला दौरा: राम मंदिर देणगी संदर्भातील कथित घोटाळ्याच्या तपासासाठी विशेष तपास पथक (SIT) स्थापन झाल्यानंतर मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा हा पहिलाच अयोध्या दौरा होता. कठोर कारवाईचे संकेत: अयोध्येत माध्यमांशी बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, भाविकांच्या श्रद्धेचा गैरवापर करणाऱ्यांची गय केली जाणार नाही आणि ङ्खढ च्या अहवालानुसार दोषींवर तातडीने कठोर कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे.

# शाहरुख खानने खरेदी केले दिल्लीतील जुनी वास्तू; भावनिक आठवणी जपण्याचा प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अभिनेता शाहरुख खानने दिल्लीतील पंचशील पार्क परिसरातील ती वास्तू खरेदी केल्याची बातमी समोर आली आहे, जिथे त्याने पत्नी गौरी खानसोबत वैवाहिक जीवनाची सुरुवात केली होती. या मालमत्तेची किंमत सुमारे ३७ कोटी रुपये असल्याचे वृत्त आहे.

ही खरेदी केवळ आर्थिक गुंतवणूक म्हणून पाहण्याऐवजी, शाहरुख खानच्या वैयक्तिक आयुष्यातील महत्त्वाच्या आठवणींशी जोडलेला निर्णय म्हणून पाहिली जात आहे. प्रसिद्धी, संपत्ती आणि यशाच्या शिखरावर पोहोचल्यानंतरही आपल्या संघर्षाच्या काळातील ठिकाणाशी नाते जपण्याचा त्याचा प्रयत्न यातून दिसतो.



अशा प्रकारे जुन्या आठवणींशी जोडलेल्या वास्तूंचे जतन करणे हे सांस्कृतिक आणि भावनिक दृष्टिकोनातून महत्त्वाचे ठरू शकते.

मात्र, कोणत्याही मोठ्या व्यक्तीच्या मालमत्ता खरेदीकडे पाहताना त्या व्यवहाराची पारदर्शकता, कायदेशीर प्रक्रिया आणि संबंधित नियमांचे पालन यालाही तितकेच महत्त्व आहे.

शाहरुख खानचा हा निर्णय त्याच्या वैयक्तिक प्रवासातील एका महत्त्वाच्या टप्प्याची आठवण जपण्याचा प्रयत्न मानला जात आहे.

यश मिळाल्यानंतरही आपल्या सुरुवातीच्या काळाशी जोडलेले संबंध टिकवून ठेवण्याची ही भूमिका अनेकांसाठी प्रेरणादायी ठरू शकते.

## राज्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस; पण नंदुरबार अद्याप 'तहानलेलाच', कोकणात सर्वाधिक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** आठवडाभराच्या दमदार पावसानंतर सध्या राज्यात पावसाने काहीशी उसंत घेतली आहे. १ जून ते १० जुलै या कालावधीत राज्यात सरासरीच्या सुमारे १०६ टक्के इतका समाधानकारक पाऊस पडला आहे. मात्र, राज्याची ही एकूण आकडेवारी सुखावणारी असली तरी नंदुरबार जिल्हा अद्यापही पाण्याच्या प्रतीक्षेत असून तहानलेलाच आहे. जिल्ह्यातील तीन तालुक्यांमध्ये २५ टक्क्यांपेक्षाही कमी पाऊस पडल्याने तेथे चिंतेचे वातावरण दरम्यान, महसूल विभागनिहाय विचार करता कोकण विभागात सर्वाधिक १३०५ मिलिमीटर म्हणजेच सरासरीच्या १२९ टक्के पाऊस झाला असून, छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वांत कमी म्हणजे १६३ मिलिमीटर (सरासरीच्या ८४ टक्के) पाऊस झाला आहे. टक्केवारीचा विचार केल्यास नागपूर विभागात सरासरीच्या ७१ टक्के पाऊस झाला आहे.कृषी विभागाने दिलेल्या आकडेवारीनुसार १ जून ते १० जुलै या ४० दिवसांच्या कालावधीत राज्यात केवळ २० पर्जन्य दिवसांची नोंद झाली आहे. राज्यात या काळात एकूण ३३२.९ मिलिमीटर प्रत्यक्ष पाऊस झाला असून तो सरासरीच्या (३१४.३ मिलिमीटर) १०५.९२ टक्के इतका आहे. तर जुलै महिन्यात कोकण विभागात सर्वाधिक ९३१ मिलिमीटर म्हणजेच सरासरीच्या ८८ टक्के पाऊस झाला असून, छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वांत कमी म्हणजे अवघा ५०.६ मिलिमीटर (२७ टक्के) पाऊस झाला आहे.

## पुनीत बालन ग्रुप'कडून आषाढी वारीतील पोलिसांना ९ हजार जीवनावश्यक वस्तूंचे किट

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पंढरपूरमध्ये आषाढी वारीच्या कालावधीत बंदोबस्तासाठी येणारे पोलिस अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी पुनीत बालन ग्रुप'कडून जीवनावश्यक वस्तूंचे ९ हजार कीट देण्यात आले आहेत. या किटमध्ये दैनंदिन गरजेच्या वस्तूंचा समावेश असल्याने वारीच्या बंदोबस्ताच्या कालावधीतील पोलीस बांधवाची गैरसोय टळणार आहे आणि परिणामी त्यांना दर्शनासाठी येणाऱ्या वारकऱ्यांना अधिक चांगली सेवा देता येणार आहे.

आषाढी एकादशीच्या निमित्ताने दरवर्षी संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज यांच्यासह अन्य संताच्या पालखी समवेत लाखो वारकरी पंढरपुरमध्ये दर्शनासाठी येत असतात. १५ ते १९ जुलै या कालावधीत संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींची पालखी ही सातारा जिल्ह्यातून मार्गक्रम करत असते. लोणंद, तरडगाव, फलटण, बरड या भागातून पालखीचे मार्गक्रमण होत असताना २७०० पुरुष पोलिस आणि ३०० महिला पोलिस बंदोबस्तासाठी असतात. त्यांच्यासाठी ३ हजार कीट उपलब्ध करुन देण्याची विनंती सातारा पोलिस अधीक्षक कार्यालयाकडून करण्यात आली होती. तसेच २५ जुलै रोजी पंढरपुरात भरणाऱ्या आषाढी वारीसाठी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली आणि जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज या प्रमुख पालख्यांसह राज्यभरातील शेकडो पालख्या आणि दिंड्या पंढरपुरात दाखल होत असतात.

# ई२० पेट्रोलवर सरकारचा ठाम दावा; मात्र ग्राहकांच्या शंका कायम, 'शुद्ध पेट्रोल'ची मागणी पुन्हा चर्चेत

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशात ई२० (२० टक्के इथेनॉल मिश्रित पेट्रोल) इंधनाच्या वापरावरून सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने पुन्हा एकदा या निर्णयाचे समर्थन केले आहे. शुद्ध पेट्रोल उपलब्ध करून देणे व्यवहार्य नसल्याचे सांगत सरकारने ई२० इंधन अधिक स्वच्छ, पर्यावरणपूरक आणि दीर्घकालीन दृष्टीने फायदेशीर असल्याचा दावा केला आहे. मात्र, वाहनचालक, तज्ज्ञ आणि काही उद्योग क्षेत्रांकडून उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नांमुळे या धोरणावर टीका कायम आहे.

सरकारच्या म्हणण्यानुसार, इथेनॉल मिश्रित पेट्रोलमुळे कच्च्या तेलाच्या आयातीवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत होते तसेच प्रदूषणात घट करण्यासाठी हे इंधन महत्त्वाची भूमिका बजावू शकते. देशातील कृषी क्षेत्रालाही यामुळे फायदा होतो, कारण इथेनॉल निर्मितीसाठी ऊस, मका आणि इतर कृषी उत्पादनांचा वापर केला जातो. केंद्राचा दावा आहे की ई२० इंधन हे केवळ पर्यावरणाच्या दृष्टीने नव्हे, तर ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीनेही उपयुक्त आहे.

मात्र, सरकारच्या या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करणारे मुद्देही समोर आले आहेत. अनेक वाहनधारकांनी ई२० इंधनामुळे जुन्या वाहनांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली आहे. इथेनॉलचे प्रमाण वाढल्याने काही वाहनांच्या इंजिनच्या भागांवर, मायलेजवर आणि देखभालीच्या खर्चावर परिणाम होऊ शकतो, अशी चिंता व्यक्त केली जात आहे. वाहन उद्योगातील काही तज्ज्ञांनीही सर्व वाहनांसाठी ई२० इंधन कितपत योग्य आहे, याबाबत




अधिक स्पष्टता आणि माहिती देण्याची मागणी केली आहे.

शुद्ध पेट्रोलची मागणी करणाऱ्या ग्राहकांच्या प्रश्नाला उत्तर देताना सरकारने सांगितले आहे की, देशभरात स्वतंत्रपणे १०० टक्के पेट्रोल उपलब्ध करून देणे ही मोठी लॉजिस्टिक आणि आर्थिक अडचण ठरू शकते. विविध प्रकारच्या इंधनासाठी स्वतंत्र साठवण, वाहतूक आणि वितरण व्यवस्था उभी करावी लागेल, ज्यामुळे खर्च वाढू शकतो, असे सरकारचे म्हणणे आहे.

तथापि, ग्राहकांच्या निवडीच्या अधिकाराचा मुद्दाही या चर्चेचा केंद्रबिंदू ठरत आहे. इंधन धोरण ठरवताना पर्यावरणीय उद्दिष्टे आणि आर्थिक फायदे महत्त्वाचे असले, तरी वाहनधारकांच्या प्रत्यक्ष अनुभवांकडे दुर्लक्ष करता येणार नाही, अशी भूमिका अनेकांकडून मांडली जात आहे. सरकारने ई२० चे फायदे सांगताना त्याचे संभाव्य परिणाम, विशेषतः जुन्या वाहनांवरील परिणाम, याबाबत अधिक पारदर्शक माहिती देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

ई२० च्या अंमलबजावणीमागे सरकारची भूमिका स्पष्ट असली, तरी या धोरणाला व्यापक स्वीकार मिळवण्यासाठी जनजागृती, तांत्रिक मार्गदर्शन आणि ग्राहकांच्या शंकांचे निराकरण करणे गरजेचे आहे. केवळ पर्यावरणीय फायदे सांगून धोरण स्वीकारले जाईल, अशी अपेक्षा ठेवण्याऐवजी वाहनधारकांच्या अनुभवांनाही समान महत्त्व देण्याची गरज आहे.

इंधन क्षेत्रातील बदल हे दीर्घकालीन परिणाम करणारे असतात. त्यामुळे ई२० इंधनाच्या फायद्यांसोबतच त्याच्या मर्यादा आणि आव्हानांवरही खुली चर्चा होणे आवश्यक आहे. सरकारचा दावा आहे की ई२० हे भविष्यासाठी योग्य पाऊल आहे; मात्र ग्राहकांचा विश्वास मिळवणे हे या धोरणाच्या यशासाठी तितकेच महत्त्वाचे आव्हान राहणार आहे.